**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १५ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **वक्फ सुधारणा कायद्याला पूर्ण स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार.**
2. **महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून आचार्य देवव्रत यांनी स्वीकारला कार्यभार.**
3. **रामटेक चित्रनगरीसाठी 60 एकर जमिनीचं येत्या 15 दिवसात हस्तांतरण करणार - सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांची माहिती.**
4. **विकसित राष्ट्राच्या उद्दिष्टपूर्तीत अभियंत्यांनी योगदान द्यावं - डॉ.अभय करंदीकर यांचं VNIT दीक्षांत सोहळ्यात प्रतिपादन.**
5. **नागपुरात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पर्जन्यवृष्टी.**

---

वक्फ सुधारणा

वक्फ सुधारणा कायदा २०२५ ला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयानं नकार दिला असून, काही तरतुदींच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली आहे. या कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आज सरन्यायाधीश बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. सुधारित कायद्यातल्या सगळ्या तरतुदींना स्थगिती देण्यासाठी कोणताही आधार नाही; मात्र काही कलमांना संरक्षणाची आवश्यकता न्यायालयानं व्यक्त केली. वक्फ निर्माण करण्यासाठी व्यक्ती ५ वर्षांसाठी इस्लाम धर्माचा अनुयायी असावा, या तरतुदीला स्थगिती देण्यात आली असून, एखादी व्यक्ती इस्लाम धर्माचा अनुयायी आहे की नाही, हे ठरवण्यासाठी नियम तयार होईपर्यंत ही तरतूद स्थगित राहील, असं न्यायालयानं म्हटलं आहे. त्याचप्रमाणं वक्फ मालमत्तेनं सरकारी मालमत्तेवर अतिक्रमण केलं आहे की नाही, या वादाचं निवारण करण्यासाठी सरकारनं नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला सक्षम करणाऱ्या वक्फ सुधारणा कायद्यातील तरतुदीलाही सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली आहे.

---

कृत्रिम बुद्धिमत्ता अहवाल

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर वेगानं वाढत असल्यामुळे त्याचं नियमन सुद्धा तितकंच आवश्यक झालं आहे, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. टेक रिपॉजिटरी आणि विकसित भारत संकल्पनेसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठीच्या धोरणाचा अहवाल निती आयोगानं आज नवी दिल्लीत सादर केला, त्यावेळी अर्थमंत्री बोलत होत्या. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबत नागरिकांनी जागरूक राहायला हवं, देशातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये विकास साधण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तंत्रज्ञानाचा स्वीकार करायला हवा, असं त्या म्हणाल्या.

-----------------------------------------

राज्यपाल आचार्य देवव्रत

महाराष्ट्राचे नवनियुक्त राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज मुंबईच्या राजभवनात राज्यपालपदाची शपथ घेतली. मुंबई उच्च नायायालयाचे मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर यांनी आचार्य देवव्रत यांना पदाची शपथ देववली. देवव्रत यांनी संस्कृत भाषेत शपथ घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. माजी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची देशाच्या उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यामुळे गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. देवव्रत हे २०१९ पासून गुजरातचे राज्यपाल आहेत. त्याआधी त्यांनी हिमाचल प्रदेशचे राज्यपाल म्हणून जबाबदारी सांभाळली होती.

-----------------------------------------

'सेवा पर्व'

सार्वजनिक सेवा आणि सुशासन या मंत्रानं मार्गदर्शित, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार, परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. आज 'सेवा पर्व' या विशेष मालिकेत केंद्र सरकारच्या पर्यावरण आणि जैवविविधतेविषयीच्या उपक्रमांबद्दल आपण जाणून घेऊया...

***पॅकेज***

***(व्हाईस कास्ट - नम्रता फलके (१ मिन ३ सेकंद)***

*2014 पासून प्रकल्प वाघ आणि प्रकल्प सिंहापासून ते महत्त्वाकांक्षी प्रकल्प चित्तापर्यंत, प्राण्यांचे अधिवास मजबूत करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले -*

***(होल्ड बाइट - पंतप्रधान नरेंद्र मोदी -३० सेकंद )***

***आज भारत की धरती पर चित्ता लौट आए हैं और इन चीतों के साथ ही भारत की प्रकृति प्रेमी चेतना भी पूरी शक्ति से जागृत हो उठी है।***

*चित्ता प्रकल्पाला यश मिळत असून भारतीय अधिवासत चित्यानी नवीन पिल्लांना देखील जन्म दिला. याशिवाय भारतातील जंगलात जगातील सर्वाधिक वाघांचं वास्तव्य आहे. आशियाई सिंहांची संख्या 891 पर्यंत वाढली आहे. मागील दशकात ही वाढ 70 टक्के इतकी नोंदविली गेली.*

---------------------------------------

रामटेक चित्रनगरी

चित्रपट निर्मिती आणि विदर्भात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीनं रामटेक इथं उभारण्यात येणाऱ्या चित्रनगरीसाठी येत्या 15 दिवसांत 60 एकर जमीन हस्तांतरित करण्याचा तसंच चित्रनगरी निर्मितीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली. रामटेक शेजारील नवरगाव इथं प्रस्तावित चित्रनगरीच्या जागेची पाहणी शेलार यांनी आज केली, त्यानंतर शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीनंतर त्यांनी ही माहिती दिली. रामटेक गड मंदिरातील व्यापक विकास, सुशोभीकरण, ऐतिहासिक संवर्धन आणि जपणूक अशी विविध 23 विकास कामं 'रामटेक मंदिर हेरिटेज कॉरिडॉर' या नावानं करण्यात येणार असून ही कामं राज्य विधिमंडळाच्या आगामी अर्थसंकल्पात प्रस्तावित आणि मंजूर करून घेण्यात येतील. त्याचप्रमाणं 'प्राचीन वारसा स्थळे मनसर' या नावानं एकूण 156 एकरात प्राचीन मूल्य असणारी स्मारकं अस्तित्वात असून स्मारक संवर्धनाच्या या प्रकल्पाला गती देण्यासाठी लवकरच एक सविस्तर प्रस्ताव तयार करून केंद्रीय सांस्कृतिक मंत्री यांची स्वतः भेट घेणार असल्याचं शेलार यांनी सांगितलं.

---------------------------------------

जीएसटी

वस्तू आणि सेवाकर आता फक्त 5 टक्के आणि 18 टक्के अशा दोन स्तरात आकारला जाणार आहे. सामान्य जनतेसह व्यापारी वर्गानं देखील या निर्णयाचं स्वागत केलं आहे. नागपूरचे किरकोळ विक्रेते आणि व्यापारी राजू जैन यांनी जीएसटी विषयक निर्णय हितकारी असल्याचं म्हटलं आहे -

***(होल्ड बाईट १८ सेकंद)***

***हमारी दीपावली पर्व में हमारे घर की गृहणियां जो हमारी पहुँच से जो वस्तु बाहर हो गई थी, इलेक्ट्रॉनिक्स आइटम की अब हम लोग वो आसानी से खरीद सकते***

***हैं. जिससे कि जो इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्र के जो व्यापारी है उनकी कमाई में भी काफी इजाफा होगा और खरीदने में भी हमें बहुत आसानी होगी।***

---------------------------------------

विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था

2047 पर्यंत 'विकसित भारत' घडविण्याचं उद्दिष्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ठेवलं असून त्यामध्ये योगदान देण्याच्या भरपूर संधी अभियंत्यांकडं उपलब्ध असल्याचं मत भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव डॉ. अभय करंदीकर यांनी व्यक्त केलं. नागपूरच्या विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थानचा 23 वा दीक्षांत समारंभ संस्थानच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. आजच्या घडीला कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि डेटा सायन्स या क्षेत्रात अफाट क्षमता असून यामुळे क्रांतिकारी आणि विकासात्मक परिवर्तन घडवून आणलं जाऊ शकतं, असं त्यांनी विद्यार्थ्यांना सुचवलं. यावेळी दीक्षांत समारंभात एकूण 1 हजार 227 पदव्या वितरित करण्यात आल्या. त्यापैकी 70 विद्यार्थ्यांना आचार्य पदवी आणि विविध अभियांत्रिकी शाखांमध्ये 271 विद्यार्थ्यांना मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी पदवी प्रदान करण्यात आल्या. याव्यतिरिक्त विद्यार्थी आणि संशोधकांना उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीबद्दल पदकं आणि विविध पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेचे अध्यक्ष एम. मदन गोपाल, विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थान नागपूरचे संचालक प्रो. प्रेमलाल पटेल उपस्थित होते.

---------------------------------------

शरद पवार

विधानसभा निवडणुकीच्या वेळी राज्य सरकारनं शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची घोषणा केली होती. त्याची एक महिना मुदतीत अंमलबजावणी करावी, अन्यथा राज्यभर मोर्चे काढण्यात येतील, असा इशारा आज राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीनं शरद पवार आणि अन्य नेत्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी तसंच अन्य मागण्यांसाठी आज नाशिक शहरात शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

---------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे पत्रकार परिषद

उद्धव ठाकरे यांच्या वक्तव्यामुळे माजी मुख्यमंत्री म्हणून असलेली त्यांची प्रतिमा मलीन झाली असल्याची टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. महसूलमंत्री तथा

नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधत विविध मुद्द्यांवर भूमिका स्पष्ट केली. पावसानं झालेल्या नुकसानाबाबत बोलताना ते म्हणाले -

***(होल्ड बाईट- चंद्रशेखर बावनकुळे)***

***मुख्यमंत्र्यांच्या सूचनांनुसार राज्यात अनेक ठिकाणी पंचनामे सुरू झाले असून केंद्र व राज्य सरकारच्या नियमांनुसार शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई दिली जाणार आहे.***

शेतकऱ्यांना योग्य मोबदला भूसंपादन कायद्याप्रमाणं मिळेल. संपादनाच्या वेळी शेतकऱ्यांशी चर्चा करूनच निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन देखील त्यांनी दिलं.

**---------------------------------------**

हवामान

विदर्भात उद्या चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्हा वगळता सर्वत्र वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. यादरम्यान अमरावती, अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. तत्पूर्वी नागपुरात आज दुपारच्या वेळी विजांच्या जोरदार कडकडाटासह मुसळधार पर्जन्यवृष्टी झाली. सुमारे तासभर झालेल्या पावसानं मोठ्या प्रमाणात वाहतुकीचा खोळंबा होऊन सखल भागात पाणी शिरल्याचं वृत्त आहे. येत्या काही तासात विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी वीजगर्जनेसह वादळ येण्याची आणि मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, मुंबईसह राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दुपारी मंत्रालयातील राज्य आपत्कालीन कार्य केंद्राला भेट देत उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी अतिवृष्टीग्रस्त जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधत मदत आणि बचावकार्याबाबत माहिती घेतली आणि जिल्हा प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना दिल्या.

**---------------------------------------**